# वाईल्ड कॅम्पचा नवीन दौरा

पावसाळा दरवर्षी येणारा असला तरीही दरवर्षी तो नाविन्यपूर्णच वाटतो. तापलेल्या धरतीवर, वाळलेल्या गवतावर जेव्हा पावसाचे निरागस नवीन थेंब पडतात तेव्हा निसर्गाची कांती बहरून जाते. निसर्गाचे एक निराळेच रूप आपल्याला मोहवून टाकते. ओल्या मातीचा सुगंध श्वासात दरवळून मन प्रसन्न करतो. पावसाची रिमझिम दरवर्षी ऐकून देखील दर पावसाच्या सुरुवातीला ती नवीनच वाटते व आपल्या कानाला तो मधुर स्वर हवाहवासा वाटतो. अशी जशी या पावसाची गंमत आहे तशीच आपल्या लाडक्या पावसाळी डेस्टीनेशन वाईल्ड कॅम्पची. दरवर्षी पावसाळ्यात वाईल्ड कॅम्प वेगळेच निखरून येते. पण या वर्षी तर खरंच वाईल्ड कॅम्प तुम्हाला एका नवीन आकर्षक रूपात भेटणार आहे. दर्दी पर्यटकांच्या आवडीचे डेस्टीनेशन उगीचंच नाहीये वाईल्ड कॅम्प आणि जास्तीत जास्त लोक इथे यावेत म्हणूनच डॉ. जितेंद्र खेर यांनी वाईल्ड कॅम्प एका वेगळ्याच टप्प्यावर नेले आहे. इथे नवीन नऊ लक्झुरीयस कॉटेजेस विथ माउंटन व्ह्यूची उभारणी केली आहे. या कॉटेजेसचं मॉडर्न व सुरेख इंटेरीअर तर तुम्हाला मोहवून टाकतच, पण यांचं खास वैशिष्ट्य म्हणजे या रूम्समध्ये शिरल्या-शिरल्या समोर दिसणारे अविस्मरणीय दृश्य. प्रत्येक कॉटेजला एक प्रशस्त प्रायव्हेट व्हरांडा आहे. आणि या व्हरांड्यात एक सुबकसा झोपाळा. निसर्गाचा आस्वाद लुटत, झोपाळ्यावर झुलत, थंड वारा अंगावर घेत, पावसाची रिमझिम ऐकत कुणाचे मन शांत व हलके नाही होणार? गरज आहे का कोणत्या महागड्या स्पाची? या नवीन रुम्स नावाप्रमाणे अगदी लक्झुरीयस आहेत इथे तुम्हाला भरभरून निसर्ग अनुभवता येतो आणि भरभरून निसर्ग मिळणे. ही आजकाल एक लक्झरीच झाली आहे, नाही का? या सिमेंट कॉंक्रीटच्या जंगलात पावसाचा अगदी कंटाळाच येतो, म्हणून तर मुंबईपासून केवळ दोन तासाच्या व नाशिकापासून जवळजवळ एक तासाच्या अंतरावर वसलेले वाईल्ड कॅम्प आपल्याला अगदी अद्भुत वाटते.


डॉ. तेंद्र खेर



जव्हार फाट्याच्या आत शिरताच सुरू होते एक वेगळी दुनिया. छोटा सुरेख रस्ता, ट्रॅफीकचा जिथे मागमूसदेखील नाही. वाटेवर छोटी-छोटी आदिवासी गावं, शेती, बैल नांगरणी, गाई-बकऱ्या चरताना दिसणे-एक वेगळेच दृश्य आपण पाहतो जे आपल्या डोळ्यांना गारवा देते आणि कधी हा रस्ता संपून आपण वाईल्ड कॅम्पला पोहोचतो आपल्याला कळत देखील नाही.

वाईल्ड कॅम्पची नाविन्यता आपल्याला गेटमध्ये एन्ट्री केल्यावरच समजते. मनमोहक वारली पेंटिंगने सजवलेल्या रिसेप्शनमध्ये फ्रेश झाल्यावार जेव्हा आपण रूम्समध्ये जातो तेव्हा प्रवासाचा अर्धा थकवा गेलेलाच असतो आणि उरलेला अर्धा थकवा वाईल्ड कॅम्पच्या इतर सुविधा दूर करतात. दोन प्रशस्त स्विमिंग पूल्स, रेन डान्स, नवीनच केलेले ओपन एअर जिम व इन्डोअर गेम्स रूम, नव्याने रचलेला किड्स प्ले एरिया हे सर्व पर्याय तुमच्या करमणुकीसाठी आहेतच आणि जोडीला वाईल्ड कॅम्पचा जिव्हाळ्याचा स्टाफ जो तुम्हाला काहीही कमी पडू देणार नाही. अगदी राहण्यापासून ते खाण्यापर्यंत तुमची काळजी घेतली जाते. व्हेज-नॉनव्हेज चविष्ट अन्नाचा आस्वाद तुम्ही इथल्या ओपन एअर रेस्टॉरंट अँड बारमध्ये घेऊ शकता. शिवाय राहण्याचे कॉटेजेस व डॉरमेटरीज हे पर्यायही आहेतच. असे एक डॉ. खेरांनी नव्या रूपाने रचलेले वाईल्ड कॅम्प, नव्या जोशाने तुमच्या स्वागतासाठी सज्ज आहे. तर मग प्लॅन करा तुमचे गेट टुगेदर्स, पिकनिक्स किंवा एखादा विकेंड गेट अवे आणि आपल्याच वाईल्ड कॅम्पचा अनुभवा एक नवीन दौरा.



**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**022-25306263 / 9224586060 / 9920994229.**

**www.wildcamp.in**